# Dayanand Science College, Latur

दयानंद शिक्षण संस्था, लातूर

"आ नो भद्रा क्रतवो यन्त विश्वतः"

## Report of Collaborative activities conducted With Latur District Collector Office and Govt. of Maharashtra during 2017-18 to 2020-21

| Sr. No. | Name of the activity | Date of the activity |
|---|---|---|
| 1. | Annual Gathering inauguration and address to students and other stakeholders | 03.02.2018 |
| 2. | Science Exhibition in collaboration with Sunday Science School and Dayanand Science College, Latur inauguration | 11.02.2018 |
| 3. | STP plant inauguration | 03.12.2019 |
| 4. | Voting awareness programme | 18.04.2019 |
| 5. | Financial assistance for development of Cricket Ground | 06.05.2019 |
| 6. | Eradication of TB & Health awareness campaign | 31.01.2020 |
| 7. | Sendoff and welcome function of District collector | 15.12.2020 |

1. Annual Gathering inauguration and address to students and other stakeholders 03.02.2018









दयानंद विज्ञान महाविद्यालय,
लातूर.
वार्षिक
स्नेहसंमेलन




**लातूर : दयानंद विज्ञान महाविद्यालयात स्नेहसंमेलनाच्या समारोपप्रसंगी बोलताना जिल्हाधिकारी जी. श्रीकांत. यावेळी डॉ. जयप्रकाश दरगड, डॉ. एस. एस. बेल्लाळे, दासराव सूर्यवंशी आदी.**

# शिक्षणाच्या जोरावर यशाचे शिखर गाठा

## जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांचे आवाहन

**लातूर, ता. ४ (बातमीदार)** : शिक्षणाच्या जोरावर यशाचे शिखर गाठले पाहिजे. विद्यार्थी दशेतच

योग्य अभ्यास करून स्पर्धा परीक्षेच्या माध्यामातून जीवनाला कलाटणी द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. या वेळी प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, उपप्राचार्य डॉ. एस. एस. बेल्लाळे, प्रशासकीय अधिकारी दासराव सूर्यवंशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. डी. टी. जगताप, श्रीकांत उडगे, हरिकिशन मालू, विद्यार्थी परिषद प्रमुख डॉ. आण्णाराव चौगुले, साहित्य आणि सांस्कृतीक मंडळाच्या प्रभारी प्रा. मेघा पंडित, विद्यार्थी परिषद सचिव महेश पवार, प्रा. ए. व्ही. भोसले, कार्यालयीन अधीक्षक सुधीर तिवारी, प्रा. शशिकांत कदम, अपेक्षा चाकोते, स्नेहा रोही उपस्थित होते.


जीवनाच्या यशस्वीतेचा खरा मूलमंत्र अथक परिश्रम हाच आहे. यश स्वत:च्या हिंमतीवर मिळविले पाहिजे. चांगले मित्र कमविण्याबरोबर आई-वडिलांचा, गुरुजनांचा आदर केला पाहिजे. प्रामाणिकपणा, जिद्द, आत्मविश्वास मनाशी बाळगावा, असे आवाहन त्यांनी केले. पूजा माने यांनी सूत्रसंचालन केले. अभिजीत कसपटे यांनी आभार मानले. यासाठी डॉ. आण्णाराव चौगुले, डॉ. एम. ए. बेंबडे, डॉ. एन. एस. कोरडे, प्रा. मेघा पंडित, डॉ. गजानन बने, डॉ. रामशेट्टी शेटकार, डॉ. एस. एन. इबाते, प्रा. एस. के. आळणे उपस्थित होते.

2. Science Exhibition in collaboration with Sunday Science School and Dayanand Science College, Latur inauguration 11.02.2018







# प्रयोगाची माहिती घेत जिल्हाधिकारी रमले चिमुकल्यांत!

## संडे सायन्स स्कूलच्या विज्ञान प्रदर्शनाला विद्यार्थी व पालकांचा प्रतिसाद



लातूर : संडे सायन्स स्कूलतर्फे रविवारी दयानंद विज्ञान महाविद्यालयात प्रदर्शनातील प्रयोगांची पाहणी करताना जिल्हाधिकारी जी. श्रीकांत.

**सकाळ वृत्तसेवा**

लातूर, ता. १५ : ग्रहांची मालिका, ऊर्जेचे रूपांतर, हवामान, समतोल यांसह विविध विषयांवर चिमुकल्यांनी सादर केलेल्या प्रयोगांची माहिती घेताना जिल्हाधिकारी जी. श्रीकांत त्यांच्यात चांगलेच रमले. विज्ञानातील प्रयोगांचा रोजच्या जीवनात काय उपयोग होतो, याची माहिती विद्यार्थ्यांकडून जाणून घेताना विज्ञानाच्या संकल्पना इंग्रजीसोबत आपल्या मातृभाषेतही स्पष्ट असायला हव्यात, असा सल्लाही त्यांनी या वेळी दिला.

निमित्त होते रविवारी (ता. ११) दयानंद विज्ञान महाविद्यालयात संडे सायन्स स्कूलच्या वतीने आयोजित विज्ञान प्रदर्शनाला त्यांनी दिलेल्या भेटीचे! महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, उपप्राचार्य डी. टी. जगताप, सायन्स असोसिएशनचे प्रभारी प्रा. डॉ. श्रेयस माहुरकर व प्रा. एस. डी. पाटील यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच प्रयोगातून विज्ञान शिकवून विज्ञानाच्या संकल्पना स्पष्ट करण्याच्या हेतून संडे सायन्स स्कूलच्या वतीने दर रविवारी दोन तासांचा उपक्रम घेण्यात येतो. उपक्रमाच्या वर्षपूर्तीनिमित्त विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यात विद्यार्थ्यांनी विविध विषयावरील प्रयोगांची मांडणी केली होती. प्रत्येक प्रयोगाची पाहणी करून जिल्हाधिकारी श्रीकांत यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून जाणीवजागृती करण्याचा प्रयत्न केला.

विद्यार्थ्यांनीही त्यांच्या प्रश्नाला उत्तरे दिली. प्रश्नोत्तरांतून प्रयोगाच्या संकल्पना दृढ होण्यास मदत मिळाली. त्यापूर्वी प्राचार्य डॉ. दगरड यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. संशोधक व शास्त्रज्ञांची कमी असल्याने देशाला महासत्ता बनवण्याचे स्वप्न तडीस नेणे कठीण होऊन बसले आहे. यामुळे देशाप्रती समर्पणाच्या भावनेतून काम करणाऱ्या संशोधक व शास्त्रज्ञांची संख्या वाढली पाहिजे. यासाठी शालेय जीवनापासून संशोधक व शास्त्रज्ञ तयार करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत, असे ते म्हणाले. स्कूलचा उपक्रम आता तिसरीपासून बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी राबवण्याचा मानस श्रीमती रांदड यांनी व्यक्त केला. या विज्ञान प्रदर्शनात सहभागी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. पालक व विद्यार्थ्यांनी प्रदर्शन पाहण्यासाठी गर्दी केली होती. ऐश्वर्या अंधारे यांनी सूत्रसंचालन केले.

3. STP plant inauguration 03.12.2019



4. Voting awareness programme



5. Financial assistance for development of Cricket Ground

महाराष्ट्र शासन

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर

दूरध्वनी क्रमांक :-02382-254794 Email :-dsolatur@rediffmail.com

जाक्र जिक्रीअ/क्रीविअ/सर्व/२०१८-१९/८५ दिनांक :- 06/05/2019

प्रति,

मा. अध्यक्ष / सचिव / प्राचार्य
दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित
दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर
ता. जि. लातूर

विषय :- क्रीडांगण विकास अनुदान मंजुरी बाबत..

संदर्भ :- या कार्यालयाचे आदेश क्र. लेखावि/क्रीविअ/सर्वसा/२०१८-१९/ ११९६ दि.०१.०३.२०१९

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात क्रीडांगण विकास अनुदान (सर्वसाधारण) योजनेअंतर्गत निर्मित सुविधा विचारात घेऊन मैदानावर पाणी मारण्यासाठी स्प्रिंकलर यंत्रणा बसविणे व मैदानावर रोलिंग करण्यासाठी मिनी रोलर खरेदी करणे या बाबीसाठी रुपये ६,८७,०००/- (अक्षरी रुपये सहा लक्ष सत्याऐंशी हजार फक्त) इतके अनुदान तत्वतः मंजुर असून त्यापैकी आपल्या संस्थेस/शाळेस प्रथम हप्ता रुपये ६,६१,०००/- (अक्षरी रुपये सहा लक्ष एकसष्ट हजार फक्त ) अनुदान वरील संदर्भीय आदेशान्वये मंजुर करण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त मंजुर अनुदान वितरीत करण्यासाठी आपण या पत्रासोबत जोडण्यात आलेला करारनामा व बँक डिटेलचे प्रपत्र हे पत्र प्राप्त होताच त्याच दिवशी भरुन कार्यालयात सादर करावी. तदनंतरच आपले मंजुर अनुदान वितरीत करणे शक्य होणार आहे.

सोबत :- करारनामा व बँकेचे विहीत प्रपत्र

(नीलिमा अडसुळ)
जिल्हा क्रीडा अधिकारी
लातूर

प्रत माहितीस्तव सविनय सादर
मा. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
मा. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग लातूर













**3. Sendoff and welcome function of collector by Dayanand Education society, Latur 15.12.2020**

# क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्याची गरज : श्रीकांत

म. टा. प्रतिनिधी, लातूर

लातूर जिल्हा अतिशय चांगला असून, चांगल्या कामामध्ये प्रशासनास मदत करण्याची परंपरा जिल्ह्याने राखली आहे. नागरिकांच्या सहकार्यामुळे साडेतीन वर्षांत क्रीडा क्षेत्राला भरारी देण्याचा प्रयत्न केला. भविष्यातही क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्याची गरज आहे, अशी भावना लातूरचे मावळते जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांनी व्यक्त केली.

दयानंद शिक्षण संस्था व जिल्हा बहुविध क्रीडा संघटनेच्या वतीने मावळते जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांना निरोप व नूतन जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांचा स्वागत सोहळा आयोजित करण्यात आला होता. या वेळी ते बोलत होते.

श्रीकांत म्हणाले, 'माझ्या काळात जिल्ह्यात सर्वांत जास्त काम नागरिकांचे आरोग्य, त्याच्याशी संबंधित सुविधांना दिले. जिल्हा, तालुक्यात उद्याने, क्रीडांगण, जिम, वॉकिंग ट्रॅक तयार करण्यात आले. नागरिकांनी त्याला सहकार्य केले. दयानंद शिक्षण संस्थेच्या आवारामध्ये सर्व खेळांची मैदाने तयार करण्यात आली आहेत.'

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांच्या हस्ते या अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी व्यासपिठावर दयानंद शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, सुरेश जैन, जिल्हा बहुविध क्रीडा संघटनेचे अध्यक्ष ॲड. बळवंत जाधव, ॲड. आशिष बाजपाई, ॲड. रामराव पाटील, ॲड. श्रीकांत उटगे, संजय बोरा, अजिंक्य सोनवणे, विशाल अग्रवाल, मकरंद सावे, दिनेश इन्नानी, शतिलाल कुचेरीया, दिनानाथ भुतडा, नयन नावंदर, हरिकिशन मालु उपस्थित होते.

या सत्कार सोहळ्यात राष्ट्रीय व राज्यस्तरीय खेळात प्रावीण्य मिळवलेले, तसेच छत्रपती पुरस्कार विजेते प्राध्यापक गणपतराव माने, मोईज शेख, श्रीरंग बंडापल्ले, डॉ. पी. आर. देशमुख, सुभाष पवार, दत्ता गळाले, दत्ता सोमवंशी, अहमद शेख, चंद्रकांत पाटील, नेताजी जाधव, दत्ता गव्हाणे, दुधाले, चामले, जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.



### 'प्रशासन-नागरिकांत समन्वय ठेवू'

लातूर जिल्हा हा शैक्षणिक पंढरी म्हणून ओळखला जातो. यापूर्वीचे जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांनी ज्या पद्धतीने लोकात मिसळून समन्वय ठेवून काम केले आहे, त्याच पद्धतीने काम करू, असा विश्वास नूतन जिल्हाधिकारी पृथ्वीराज पी. बी. यांनी व्यक्त केला. क्रीडा क्षेत्राला न्याय देण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

6. Eradication of TB & Health awareness campaign

6. Eradication of TB & health awareness campaign by District representative Mr Ghodake

▶आकाश घोडके ▶क्षयरोग नियंत्रण जनजागृती आणि आरोग्य चिकित्सा शिबिर

# क्षयरोगमुक्तीसाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा

**लातूर : प्रतिनिधी**

आहारशास्त्र, व्यायामशास्त्र, आयुर्वेद या संदर्भात जागरूक राहून प्रत्येकाने आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. कारण ज्या देशातील रोगी लोकांची संख्या जास्त आहे त्या देशाचा विकास लवकर होऊ शकत नाही. म्हणूनच डब्ल्यू. एच. ओ.चे सर्व उपक्रम लक्षात घेऊन क्षयरोगमुक्त भारतासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेतला पहिजे, असे प्रतिपादन म. फुले बहुउद्देशीय सेवाभवी संस्थेचे अध्यक्ष आकाश घोडके यांनी केले.

दयानंद विज्ञान महाविद्यालयात यु.जी. सी. सीपीई अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना आणि विद्यार्थी कल्याण मंडळाच्या संयुक्त विद्यमाने 'क्षयरोग नियंत्रण जनजागृती आणि आरोग्य चिकित्सा शिबिर' या विषयावर एक दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी साधन व्यक्ती म्हणून घोडके बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड होते. या वेळी जिल्हा क्षयरोग केंद्र लातूरचे पांडुरंग गोलमालू, उपप्राचार्य डॉ. एस. एस. बेल्लाळे, प्रा. डॉ. अण्णाराव चौगुले,




रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. राहुल जाधव, डॉ. श्रेयस माहूरकर, कॅप्टन डॉ. विजेंद्र चौधरी, डॉ. स्नेहल सांगले, डॉ. कृष्णा पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

आज भारतात मधुमेह, कर्करोग, कुपोषण, काविळ, मलेरिया, क्षयरोग यासारख्या अनेक रोगांच्या व्याधींनी माणसांना ग्रासले आहे. या रोगांना आणि क्षयरोगाला प्रतिबंध घालण्यासाठी शासनाकडून ठोस पावले उचलली जात आहेत, असे सांगून घोडके म्हणाले की, ग्रामीण व शहरी भागातील लोकांनी देव, धर्म, अंधश्रध्दा, गंडेदोरे याला बळी न पडता वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून क्षयरोग तपासणी केली पाहिजे. टी. बी.मुक्त भारत करण्यासाठी त्याची लक्षणे, हा रोग होण्याची कारणे लक्षात घेऊन सुदृढ आरोग्य, निरोगी शरीरासाठी प्रत्येकांनी काळजी घेतली पाहिजे.

या प्रसंगी गोलमालू यांनी क्षयरोगमुक्तीसाठी भारतात जनजागृतीची अत्यंत आवश्यकता आहे, असे ते म्हणाले. उपप्राचार्य डॉ. बेल्लाळे यांनी क्षयरोग हा मानवी आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत गहन प्रश्न असून या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी समाजातील क्षयरोगी माणूस हा डॉक्टरच्या निदर्शनास आणून दिला पाहिजे ते प्रत्येक माणसांचे आद्य कर्तव्य आहे ते पार पाडून रोगमुक्त भारत निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे, असे ते म्हणाले. या वेळी डॉ. सारिका देशमुख, सरिता शेंडे, अनिल वाठोरे, डॉ. ऋषिकेश खरोळकर, अरुणा सोनार, दपीक पवार यांनी मार्गदर्शन केले.

या वेळी रक्त तपासणीसाठी भातांगळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे तज्ज्ञ लॅब टेक्निशियन यांनी रक्त तपासणी केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अण्णाराव चौगुले यांनी केले. सूत्रसंचालन ऐश्वर्या अंधारे यांनी तर आभार डॉ. विजेंद्र चौधरी यांनी मानले. या प्रसंगी डॉ. महेश कराळे, प्रा. श्वेता लोखंडे, डॉ. रामशेट्टी शेटकार, विकास मोरे, प्रवीण भालेराव, बिंबीसार शिकरे, अक्षता स्वामी आदी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.